**प्रसिध्दी पत्रक** दिनांक : २५/११/२०२३

**नायगांवच्या सहाय्यक निबंधक कार्यालयातील सहकार अधिकारी बाबुराव चतरू पवार यांनी वेअर हाउसचा परवाना नुतणीकरण करण्यासाठी १०,०००/— रूपयांची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे. नायगांव गुरनं १८९/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक २४.११.२०२३ रोजी २२.०८ वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | बाबुराव चतरू पवार, वय ५४ वर्षे, पद — सहकार अधिकारी (श्रेणी—१), नें. सहाय्यक निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, नायगाव (खै.), ता. नायगाव (खै.), जि. नांदेड. रा. पितृछाया निवास, जनार्दननगर, हनुमान गढ, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | १०,०००/— रूपये |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार हे रिध्दी ॲग्रो वेअर हाउसवर मागील ३ वर्षापासून वॉचमन आहेत. त्यांचे मालकाने त्यांना वेअर हाउसचा परवाना नुतणीकरण करण्याबाबत सांगितले असता, तक्रारदार यांनी सहाय्यक निबंधक सोसायटी कार्यालय, नायगाव येथे जावून रितसर शासकीय फि भरून बँकेचे चालान भरून त्याची प्रत सहाय्यक निबंधक सोसायटी कार्यालय, नायगाव येथील सहकार अधिकारी बाबुराव पवार यांना आणून दिली. तेव्हा आरोपी लोकसेवक बाबुराव पवार यांनी मालकाकडून १०,०००/— रुपये घेवून या नंतरच काम होईल असे म्हणून दहा हजार रूपयाची मागणी केली.<br>सदरचे १०,०००/— रुपये ही लाच असल्याचे तक्रारदार व त्यांचे मालक यांना खात्री झाल्याने त्यांना ती देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली.<br>त्यानंतर दि. २०/११/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणीसाठी पाठविले असता, आरोपी लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांना तुमच्या मालकाला घेवून या असे सांगितले. दिनांक २४/११/२०२३ रोजी तक्रारदार व त्यांचे मालक यांना आरोपी लोकसेवक पवार यांची भेट घेण्यासाठी पाठविले असता, आरोपी लोकसेवक पवार यांनी पंचासमक्ष वेअर हाउसचे परवान्याचे नुतणीकरणासाठी दहा हजार रूपयाची मागणी करून १०,०००/— रुपये लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>लोकसेवक बाबुराव चतरू पवार यांनी १०,०००/—रुपयाची लाच शासकीय पंचासमक्ष स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन नायगाव, जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही डॉ.श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र, नांदेड व श्री. रमेशकुमार स्वामी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली, श्री राजेंद्र पाटील पोलीस उपअधीक्षक, यांनी पर्यवेक्षण करून सापळा अधिकारी श्रीमती प्रिती जाधव महिला पोलीस निरीक्षक, श्री प्रशांत पवार, पोलीस उपअधीक्षक, श्रीमती स्वप्नाली धुतराज, महिला पोलीस निरीक्षक, सपोउपनि श्री गजेंद्र मांजरमकर, पोह/शेख रसुल, पोना/राजेश राठोड, चापोना/प्रकाश मामुलवार सर्व लाप्रवि नांदेड यांनी केली. |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती प्रिती जाधव महिला पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड युनिट |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डींग स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| **संपर्क कमांक :— 02462—253512**<br>**टोल फ्री कमांक— 1064** | **ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन** acbmaharashtra.net |
| **मा. पोलीस अधीक्षक 9623999944** | **पोलीस उपअधीक्षक 7350197197** |
| **ई—मेल आयडी**<br>spacbnanded@mahapolice.gov.in | **ई—मेल आयडी**<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक ला.प्र.विभाग,नांदेड युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner